॥ गोऱ्या देहावरती कांति ॥

गायिकाः उषा मंगेशकर
गायकः रविंद्र साठे
गीतः ना. धों. महानोर
संगीतः पं. हृदयनाथ मंगेशकर
चित्रपटः जैत रे जैत

गोऱ्या देहावरती कांति, नागीणीची कात
येडे झालो आम्ही ज्यावी, एक दिसं रात
तुझ्या रूपाचं बाशिंग डोल्यात
तुझ्यावाचून सुन्नाट दिनरात ॥ धृ. ॥

असा बोल बोलती जग पंखात घेती
असं एखादं पाखरूं वेल्हाळ
ज्याच्या भांगात बिंदीचा गुलाल ॥ १ ॥

काल्या एकल्या राती मन मोडून जाती
असं एखादं पाखरूं वेल्हाळ
ज्याला सामोरं येतया आभाळ ॥ २ ॥

याला काय लेवू लेण मोतीपवळ्याचं रान ?
राती चांदण्या रानात शिणगार
सारी दौलत जरीच्या पदरात ॥ ३ ॥